# प्रेसनोट

दिनांक:– १४/०१/२०२२

अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग–१, उल्हासनगर या कार्यालयातील ॲसिस्टंट अकाऊन्ट व मिटीर रिडर, यांना लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | | |
|---|---|---|
| ॲन्टी करप्शन ब्युरो / घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोद कमांक | :– | उल्हासनगर पोलीस स्टेशन, ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक ४८/२०२२ वेळ १७:२७, दिनांक १४/०१/२०२२ |
| लोकसेवकाचे नाव व हुद्दा | :– | १) सचिन हरिश्चंद्र जाधव, वय ३५ वर्षे, पद– ॲसिस्टंट अकाऊन्ट, वर्ग–३, कार्यालय:– अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग–१, एक नंबर बस स्टॉप शेजारी, उल्हासनगर<br>२) तुषार मारूती बायकर, वय ४० वर्षे, पद– मिटीर रिडीग, इतर लोकसेवक (कंत्राटी), कार्यालय:– अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग–१, उल्हासनगर नं.१ बस स्टॉप शेजारी, उल्हासनगर |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १५,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | स्विकारलेली लाचेची रक्कम १५,०००/– रूपये. |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांचे रंगीला आईसक्रीम ॲन्ड जनरल स्टोअर्स व त्याच ठिकाणी ते राहण्यास असल्याने दुकानासाठी कमर्शीयल मीटर व घरासाठी घरगुती मीटर बसविण्यात आलेला असून सदर कमर्शीयल मीटरवर एकूण ४०,०००/– रूपये पेनल्टी लागत असल्याचे सांगून त्यांचेविरुध्द कारवाई न करण्यासाठी व पेनल्टीची रक्कम पुढील लाईट बीलामध्ये न लावण्यासाठी आलोसे क्र.१ व २ यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/– रुपये लाचेचे मागणी केली.<br>तक्रारदार यांनी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ११/०१/२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे या कार्यालयास लेखी तक्रार दिली. तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने पंच साक्षीदारांसमक्ष दिनांक १४/०१/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत आलोसे क्र.१ तुषार बायकर यांनी तक्रारदार यांचेकडून स्वत:करीता तसेच आलोसे क्र.२ यांचेकरीता १५,०००/– रुपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे कबुल केल्याने, सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून त्यांचेविरुध्द पंच साक्षीदारांसमक्ष आजमाविण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये दिनांक १४/०१/२०२२ रोजी १४:३७ वाजता तक्रारदार यांचेकडून १५,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असताना इलोसे तुषार बायकर यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तसेच सदरची लाच स्विकारणेकामी आलोसे क्र.२ सचिन जाधव यांनी आलोसे क्र.१ बायकर याना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने सदर प्रकरणी त्यांना १५:१० वाजता ताब्यात घेण्यात आलेले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी– मा. श्री.डॉ. पंजाबराव उगले. सो. पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---


संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेत स्थळ– acbmaharashtra@mahapolice.gov.in

Email - spacbthane@ mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन – acbmaharashtra.net

टोल फ्रि नंबर– १०६४

दुरध्वनी कमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९, व्हॉटसॲप् कमांक – ९९३०९९७७००.


( पल्लवी ढगे–पाटील )

पोलीस निरीक्षक,

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.